|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव १७ ( ) `स्वच्छ भारत - उन्हाळी प्रशिक्षण : १०० तास स्वच्छतेसाठी ` या अभिनव उपक्रमामध्ये उमवि परिक्षेत्रातील पाच हजार पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याचे उद्दीष्ट कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्धारीत करण्यात आले. पुढील शैक्षणिक वर्षापासून या उपक्रमाचा चॉईस बेस क्रेडीट कोर्स अंतर्गत समावेश करण्याचा तसेच या वर्षी या उपक्रमात सहभागी होणाऱ्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्याची घोषणा कुलगुरूंनी यावेळी केली.

मानव संसाधन विकास मंत्रालय तसेच पाणी व स्वच्छता मंत्रालय यांच्या सहयोगाने स्वच्छता उपक्रम सामुहिक चळवळ होण्याच्या उद्देशाने `स्वच्छ भारत - उन्हाळी प्रशिक्षण : १०० तास स्वच्छतेसाठी` या उपक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रात हा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवार दिनांक १७ मे रोजी प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यकम अधिकारी, विद्यार्थी विकास अधिकारी व एन.सी.सीचे कमांडींग अधिकारी यांची बैठक झाली. या बैठकीस व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.ए.बी.चौधरी, प्रभारी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.एस.टी.इंगळे हे मंचावर उपस्थित होते.

या उपक्रमासाठी नावनोंदणी करण्याची मुदत वाढविण्यात आली असून पोर्टलवर १५ जून पर्यंत नावनोंदणी करणे आवश्यक आहे अशी माहिती प्रा.इंगळे यांनी प्रास्ताविकात केली. ग्रामीण भागात जनजागृती व्हावी आणि स्वच्छतेसाठी लोकांचा सहभाग वाढावा या उद्देशाने पथनाट्य, रॅली, घनकचरा व्यवस्थापन असे अनेक उपक्रम राबविता येतील असेही ते म्हणाले. दिलीप पाटील यांनी तरूण पिढील श्रमसंस्कृतीसोबत जोडण्यासाठी हा उपक्रम असून गावाची गरज ओळखून त्या पध्दतीची कामे गावात केली जावीत अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी विविध कार्यक्रम अधिकारी यांनी काही सूचना मांडल्या.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरुंनी हा उपक्रम अभिनव असा असून स्वयंस्फुर्तीने त्यात सहभागी व्हावे असे आवाहन केले. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने या उपक्रमात दोन पाऊले पुढे टाकले असून हा उपक्रम चॉईस बेस क्रेडीट कोर्सशी पुढील शैक्षणिक वर्षापासून जोडला जाईल. यावर्षी या उपक्रमात अंतिम वर्षातील जे विद्यार्थी सहभागी होणार आहेत व त्यांचा निकाल जाहीर झाला तरी त्यांना अतिरिक्त २० गुण दिले जाणार आहेत अशी घोषणा त्यांनी केली. स्वच्छतेचे महत्व सांगताना या वर्षीच्या वर्धापन दिनापासून ग्रामीण भागातील एक आणि शहरी भागातील एक अशा दोन महाविद्यालयांना स्वच्छ आणि सुंदर महाविद्यालय असे पारितोषिक दिले जाणार असल्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली. २ ऑक्टोबर पासून आठवडाभर विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग तसेच सर्व महाविद्यालये यामध्येही साफसफाईचा उपक्रम राबविला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रा.मनोज पाटील यांनी पोर्टलवर नावनोंदणी करण्याच्या प्रक्रियेविषयीची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.दीपक सोनवणे यांनी केले. प्रा.मनोज पाटील यांनी आभार मानले.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दि. १७ मे, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी